नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २५९ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार दि. ०२ सेप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया सहा महिन्यांत करावी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; अधिसंख्य पदांवरील कर्मचाऱ्यांची माहिती दोन आठवड्यांत सादर करण्याचे निर्देश

मुंबई (समर्थ गांवकरी)

विविध शासकीय विभागांमध्ये अधिसंख्य पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची तसेच त्या अनुषंगाने उपलब्ध मूळ रिक्त पदांची सविस्तर माहिती दोन आठवड्यांच्या आत सादर करावी. आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया सहा महिन्यांच्या आत करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले.

मंत्रालय येथे आदिवासी क्षेत्रातील (पेसा) रिक्त पदांबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्रिमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल सर्व विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ पदांवरून कार्यमुक्त करण्यात आले. मात्र, अनेक कर्मचाऱ्यांनी दीर्घकाळ सेवा बजावल्याने मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांना अधिसंख्य पदांवर सामावून घेण्यात आले.

प्रत्येक विभागाने आपल्या विभागात अधिसंख्य पदांवर किती कर्मचारी कार्यरत आहेत, त्यापैकी किती कर्मचारी निवृत्त झाले आहेत आणि त्या अनुषंगाने रिक्त मूळ पदे, याची अचूक माहिती तातडीने संकलित करावी, असे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. ही सर्व माहिती मुख्य सचिव कार्यालयाकडे सादर करण्यात येणार असून, त्यानंतर संबंधित विभागांनी रिक्त पदांवरील भरतीसाठी आवश्यक व्यवस्था उभारावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या संदर्भातील कालमर्यादा कोणत्याही परिस्थितीत बदलली जाणार नसून, सर्व संबंधित विभागांनी निश्चित वेळेत माहिती सादर करून भरती प्रक्रियेची तयारी पूर्ण



करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीत अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील नियुक्त्यांच्या पडताळणी प्रक्रियेबाबत चर्चा करण्यात आली. २०१५ मध्ये करण्यात आलेल्या आढाव्यानुसार काही कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर झाले नव्हते. त्यानंतर २०१९ मध्ये करण्यात आलेल्या पडताळणीत वैधता प्रमाणपत्र नसलेल्या सुमारे ६ हजार ८६० कर्मचाऱ्यांचा प्रश्न समोर आला. यापैकी १ हजार ३४६ पदे भरलेली आहेत.

## इस्कॉनच्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त राहुरीत महा महोत्सवाचे आयोजन

मुंबई (समर्थ गांवकरी)

श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्ताने राहुरीत श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सवाचे आयोजन रविवार दिनांक ६ सप्टेंबर रोजी करण्यात आल्याची माहिती आंतरराष्ट्रीय कृष्ण भावना मूर्त संघ इस्कॉनच्या वतीने देण्यात आली आहे .



राहुरीतील पांडुरंग लॉन्स व मंगल कार्यालय येथे रविवार दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता हा महा महोत्सव होणार असून यात अभिषेक प्रवचन दर्शन कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे .

इस्कॉनच्या माध्यमातून दरवर्षी श्री भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी महा महोत्सवाच्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते . यावर्षी रविवारी ६ सप्टेंबर रोजी हा महा महोत्सवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सहकुटुंब सहपरिवार मित्रांसहित या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा , असे आवाहन इस्कॉन राहुरीच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारताच्या सुरक्षेसाठी वापरणार 'डायमंड' एआय सर्व्हेलन्स तंत्रज्ञान

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

भारतीय संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचा करार झाला आहे. भारतातील अग्रगण्य संरक्षण उत्पादन कंपनी 'आरआरपी डिफेन्स लिमिटेड'आणि जागतिक स्तरावर नावाजलेली इलेक्ट्रो–ऑप्टिकल सिस्टीम डेव्हलपर कंपनी 'ईएससी बाज' यांनी भारतात एका विशेष भागीदारीची घोषणा केली आहे. या करारांतर्गत इस्रायलचे जगप्रसिद्ध 'डायमंड – युनिक ऑब्झर्व्हेशन सिस्टीम'हे 'एआय' आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञान भारतात आणले जाणार आहे.

काय आहे 'डायमंड' तंत्रज्ञान?

'डायमंड' ही एक अत्यंत प्रगत आणि बुद्धिमत्ता आधारित सर्व्हेलन्स यंत्रणा आहे. या यंत्रणेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य



म्हणजे काळ्याकुट्ट अंधारातही ही सिस्टीम 'दिवसासारखे' स्पष्ट आणि उच्च दर्जाचे दृश्य दाखवू शकते. ८० अंश अँगल आणि हाय–रिझोल्युशन: ८० डिग्री फील्ड ऑफ व्ह्यू आणि ४२४० ÷ २८३२ रिझोल्युशनसह हे तंत्रज्ञान काम करते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) सपोर्ट: एआयच्या मदतीने धोक्याची किंवा घुसखोरीची ओळख अत्यंत वेगाने आणि अचूकतेने केली जाते. अष्टपैलू वापर: सीमा सुरक्षा, लष्करी तळ, संवेदनशील पायाभूत सुविधा आणि तातडीच्या सुरक्षेसाठी हे तंत्रज्ञान वॉच टॉवर्ससह फिरत्या वाहनांवर सहज तैनात करता येते.

## फादर प्रकाशराऊत यांना राज्यस्तरीय इच्छापूर्ती गौरव पुरस्कार प्रदान

नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा येथील ज्ञानमाऊली चर्चचे निमर्ते व ख्रिस्ती धर्मगुरूफादर प्रकाशराऊत यांनी धार्मिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय प्रेरणादायी व समाजोपयोगी कार्याबद्दल तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना देवळाली प्रवरा येथील इच्छापूर्ती प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय इच्छापूर्ती गौरव पुरस्कार शिर्डी येथे झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

देवळाली येथील इच्छापूर्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह. भ. प.संपतकाका जाधव,उपाध्यक्ष गणेश दादा भांड, दत्ता पाटील गागरे, सचिव राज्यस्तरीय पुरस्कार प्रमुख गोपाल शिंदे यांच्या उपस्थितीत सदरचा पुरस्कार फादर प्रकाश राऊत यांना प्रदान करण्यात आला.फादर प्रकाशराऊत यांनी राष्ट्रीय ऐक्याचे प्रतिक ठरलेल्या ज्ञानमाऊली चर्चची निर्मिती नेवासा येथे केली होती

या चर्चचे उदघाटन ही त्यावेळी वाणीभूषण महंत उद्धवजी महाराज मंडलिक,मौलाना हाफीज सिद्दीकी,फादर अँड्रयू जाधव व शीख,जैन,बौद्ध धर्म गुरूंच्या उपस्थितीत करून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या या कर्मभूमीत राष्ट्रीय ऐक्याचा संदेश दिला होता.गावोगावी गरज तेथे कूपनलिका बसवून पिण्याच्या पाण्याची समस्या त्यांनी सोडवल्या होत्या त्यासाठी



सौर पंप देखील बसवले होते.कोरोनाच्या संकटात गरजूंना त्यांनी घरोघरी किराणा व शिधा वाटप करून मोठा हातभार लावला होता.

फादर प्रकाशराऊत यांना राज्यस्तरीय ईच्छापूर्ती गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.राज्यस्तरीय पुरस्कारा बद्दल त्यांचे जर्मनी येथील उद्योजक व सोशल वर्कर डॉ. पेत्रा कार्कविल,सर्वपक्षीय नेते पदाधिकारी, सर्वधर्मीय बांधव,सर्वधर्मीय संत,महंत मौलाना,ख्रिस्ती धर्मगुरू यांनी अभिनंदन केले आहे.

## शहापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी

### काळे गटाच्या सौ. कविता घारे यांची बिनविरोध निवड

कोपरगांव (समर्थ गांवकरी)

कोपरगाव तालुक्यातील शहापूर ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच सौ. निशा खंडीझोड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंचपदी काळे गटाच्या सौ. कविता अंकुश घारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

शहापूर ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठीची निवडणूक प्रक्रिया नुकतीच सरपंच सौ. योगिता डांगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपसरपंचपदासाठी निर्धारित वेळेत सौ. कविता घारे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत असलेले ग्रामसेवक शिवाजी सोमवंशी यांनी सौ. कविता घारे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

यावेळी सरपंच, सर्व सदस्य, काळे गटाचे कार्यकर्ते व कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे माजी. व्हा. चेअरमन प्रवीण शिंदे यांनी नवनिर्वाचित उपसरपंच सौ. कविता घारे यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सरपंच सौ. योगिता डांगे, मावळत्या उपसरपंच सौ. निशा खंडीझोड, सर्व ग्रा.प.सदस्य, सागर घारे, रामनाथ घारे, राजेंद्र पाचोरे, रमेश डांगे, वसंत पाचोरे, जनार्दन पाचोरे, अशोक डांगे, गणेश घारे, पोपट घारे, वाल्मिक घारे, गोविंद पाचोरे, अंकुश घारे, नवनाथ डांगे, सुनीता डांगे आदी मान्यवरांसह काळे गटाचे कार्यकर्ते व शहापूर ग्रामस्थ मोठ्या




संख्येने उपस्थित होते.

नवनिर्वाचित उपसरपंच सौ. कविता घारे यांची मा. आ. अशोकराव काळे व आ. आशुतोष काळे यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उपसरपंचपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल नवनिर्वाचित उपसरपंच सौ. कविता घारे यांनी आ. आशुतोष काळे यांचे आभार मानले. ज्या विश्वासाने माझ्यावर उपसरपंचपदाची जबाबदारी सोपविली त्या विश्वासाला तडा जावू न देता सरपंच, सर्व सदस्य यांच्या सहकार्यातून शहापूर ग्रामस्थांना अपेक्षित असलेला विकास करून दाखवेल व टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

## राजूर अप्पर तहसील कार्यालयात कोतुळचा समावेश नको; अकोले तालुक्यातच कायम ठेवण्याची ग्रामस्थांची एकमुखी मागणी!

कोतुळ (समर्थ गांवकरी)

नव्याने निर्माण होणाऱ्या राजूर अप्पर तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मौजे कोतुळ गावाचा समावेश करण्यात आल्याच्या निर्णयाला कोतुळ परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी, व्यापारी, युवक व नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. कोतुळ गाव राजूर अप्पर तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्याऐवजी अकोले तालुक्यातच कायम ठेवण्यात यावे, अशी एकमुखी मागणी नागरिकांनी केली आहे. या मागणीसाठी कोतुळ गाव बंद ठेवून नागरिकांनी निषेध नोंदविला.

कोतुळ महसूल सर्कलमध्ये सुमारे ५ ते ६ गावे असून या परिसराची लोकसंख्या अंदाजे १२ ते १५ हजारांच्या आसपास आहे. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व प्रशासकीयदृष्ट्या हा परिसर अकोले तालुक्याचा महत्त्वाचा भाग आहे. गेल्या अनेक दशकांपासून कोतुळ व परिसरातील नागरिकांचे अकोले शहराशी घनिष्ठ संबंध आहेत. परिसरातील



नागरिकांची बाजारपेठ, शासकीय कामकाज, बँकिंग व्यवहार, शिक्षण, आरोग्यसेवा तसेच अन्य प्रशासकीय गरजा प्रामुख्याने अकोले शहराशी जोडलेल्या आहेत.

## पालकमंत्री डॉ. विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश; भुईकोट किल्ला विकासाला गती

### महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पाचा मार्ग मोकळा; ऐतिहासिक वारसा जपत पर्यटन सुविधांचा होणार कायापालट
### महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभागामध्ये सामंजस्य करार संपन्न

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शहराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष असलेल्या भुईकोट किल्ल्याच्या विकासाचा रखडलेला मार्ग आता मोकळा झाला आहे. भुईकोट किल्ला विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभाग यांच्यात सामंजस्य करार (चजण) संपन्न झाला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि स्टेशन कमांडर पी. सुनील कुमार यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथील लष्कराच्या मुख्यालयात हा करार करण्यात आला. या करारामुळे किल्ल्याच्या संवर्धनासोबतच पर्यटनाच्या दृष्टीने प्रस्तावित विविध विकासकामांना प्रत्यक्ष गती मिळणार आहे.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून भुईकोट किल्ल्याचा विकास करण्याची घोषणा केली होती. भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी यासाठी विशेष पुढाकार घेत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नातून केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या 'स्वदेश दर्शन २.०' योजनेअंतर्गत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला १७ मार्च २०२५ रोजी प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरी मिळाली होती.

मात्र, भुईकोट किल्ला लष्कराच्या अखत्यारीत असल्याने प्रत्यक्ष विकासकामे सुरू करण्यासाठी लष्कराची अंतिम परवानगी आवश्यक होती. या प्रक्रियेमुळे प्रकल्पाला विलंब झाला. आता महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभागामध्ये सामंजस्य करार झाल्याने विकासकामांच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा अडथळा दूर झाला आहे.

भुईकोट किल्ल्याचा होणार कायापालट

भुईकोट किल्ल्याच्या ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन करताना पर्यटकांसाठी आधुनिक आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन या प्रकल्पात करण्यात आले आहे. किल्ल्याच्या प्रवेशद्वारापासून परिसरातील पायाभूत सुविधांपर्यंत विविध विकासकामे केली जाणार आहेत.



यामध्ये भव्य प्रवेशद्वार, वाहनतळ आणि स्वच्छतागृहांची सुविधा उभारण्यात येणार आहे. तसेच किल्ल्याच्या ऐतिहासिक तटबंदीचे संवर्धन करून पर्यटकांना किल्ल्याचा इतिहास आणि वास्तूचे महत्त्व समजावे यासाठी इंटरप्रिटेशन सेंटर उभारण्यात येणार आहे.

किल्ल्याच्या पर्यटन विकासातील महत्त्वाचे आकर्षण ठरणाऱ्या कामांमध्ये बुरुज क्रमांक १ ते ११ पर्यंत सुमारे १३७० मीटर लांबीचा नेचर वॉकवे प्रस्तावित आहे. किल्ला परिसरात सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी मुक्त नाट्यगृह उभारण्यात येणार असून, परिसरातील प्रकाशव्यवस्था सुधारण्यासाठी सोलर स्ट्रीट लाईटिंग करण्यात येणार आहे.



# महिलांना स्वावलंबी बनविणारी अकोले महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था ठरली सहकार क्षेत्रातील आदर्श!

## १२ सप्टेंबरला ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा; संस्थेची वार्षिक उलाढाल तब्बल ३४ कोटी ८७ लाख ३८ हजार ३६० रुपये!





**अकोले (समर्थ गांवकरी)**

राज्यातील सहकार क्षेत्रात महिलांनी महिलांसाठी सुरू केलेली आणि महिलांना स्वतःच्या पायावर उभे करून स्वावलंबी बनविण्याचा ध्यास घेतलेली अकोले महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था ही आज राज्यातील एक आदर्श संस्था म्हणून ओळखली जात आहे. नामांकित विधिज्ञ तथा संस्थेच्या संस्थापिका-अध्यक्षा ॲड. सौ. मंगलताई किसनराव हांडे यांनी १९९३ मध्ये या संस्थेची स्थापना करून महिलादेखील सहकार क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करू शकतात, याचा आदर्श निर्माण केला. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच त्यांना छोटे-मोठे व्यवसाय उभारण्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्थेने सातत्याने केले आहे.

या संस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता व्हिजन कोचिंग क्लासेस, सारडा पेट्रोल पंपाशेजारी, अकोले येथे संस्थेच्या संस्थापिका-अध्यक्षा ॲड. मंगलताई हांडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. संस्थेच्या कार्यतत्पर व्यवस्थापिका सौ. रंजनाताई झोळेकर यांनी दैनिक समर्थ गावकरीशी बोलताना ही माहिती दिली. या सभेस सर्व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या उपाध्यक्षा श्रीमती शकुंतलाताई सारडा तसेच संचालिका सौ. छायाताई देशमुख, सौ. शोभाताई गवांदे, सौ. कुमुदिनीताई पोखरकर, सौ. सुनीताताई राठी, सौ. प्रतिभाताई सूर्यवंशी, सौ. मंदाताई सोनवणे, श्रीमती पार्वताबाई बुळे, सौ. सुरेखाताई वाकचौरे, तज्ञ संचालिका सौ. परिघाताई आरोटे, कार्यकारी संचालिका सौ. रंजनाताई झोळेकर यांनी केले आहे.

३४ कोटी ८७ लाखांची वार्षिक उलाढाल:

संस्थेच्या अहवाल सालातील आर्थिक कामगिरीवर नजर टाकली असता संस्थेची भक्कम आर्थिक वाटचाल स्पष्टपणे दिसून येते. संस्थेची सभासद संख्या २१४१ असून शेअर्स रक्कम १ कोटी १८ लाख ९३ हजार ५५५ रुपये, निधी ३ कोटी ८६ लाख ९५११ रुपये, ठेवी ७ कोटी २१ लाख २४ हजार ९५३ रुपये, कर्ज वितरण ४ कोटी ४१ लाख ६४ हजार ७३९ रुपये, तर गुंतवणूक २ कोटी ४९ लाख ६६ हजार ३३१ रुपये आहे. संस्थेचे खेळते भागभांडवल ८ कोटी २७ लाख ५७ हजार १५९ रुपये असून संस्थेने तब्बल ३४ कोटी ८७ लाख ३८ हजार ३६० रुपयांची वार्षिक उलाढाल केली आहे.

संस्थेची मालमत्ता १४ लाख १७ हजार ५४५ रुपये असून अहवाल सालात संस्थेला १ लाख ४५ हजार ३९६ रुपये ४९ पैसे नफा प्राप्त झाला आहे. संस्थेने शिडी गुणोत्तर ५८.७८ टक्के राखले आहे. अहवाल सालातील नफ्यातून राखीव निधीसाठी १ लाख ४० हजार रुपये तर पुढील वर्षासाठी ५ हजार ३८६ रुपये ४९ पैसे शिल्लक ठेवण्यात आले आहेत. संस्थेच्या आर्थिक व्यवहारात पारदर्शकता, संगणकीकरण आणि शिस्तबद्ध कारभारावर विशेष भर देण्यात येत आहे.

'संस्था म्हणजे एक परिवार' - ॲड. मंगलताई हांडे:

संस्थेच्या अध्यक्षा ॲड. मंगलताई हांडे म्हणाल्या की, 'संस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून एक परिवार आहे. सभासदांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, महिलांना एकत्र आणणे आणि त्यांच्या संसाराला, प्रपंचाला आर्थिक हातभार लावण्यासाठी महिलांनी पुढे यावे, हा संकल्प घेऊन संस्थेने वाटचाल सुरू केली. आज अनेक महिलांना स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी संस्थेमुळे मिळाली आहे.'

अनेक आव्हानांना सामोरे जात संस्थेने प्रगतीचा आलेख सातत्याने उंचावला आहे. कोणतेही यश हे एका व्यक्तीचे नसून सभासद, कर्मचारी, संचालक मंडळ, ठेव प्रतिनिधी, कर्जदार आणि समाजातील विविध घटकांच्या सहकार्याचे फलित असते, ही भावना ॲड. हांडे यांनी व्यक्त केली. संस्थेचे सर्व व्यवहार संगणकीकृत असून आधुनिक पद्धतीने कारभार केला जात आहे.

कर्मचारी संस्थेचा कणा:

संस्थेच्या प्रगतीमध्ये कर्मचारी वर्गाचा मोठा वाटा असल्याचे सांगताना ॲड. मंगलताई हांडे यांनी कर्मचारी हा संस्थेचा कणा असल्याचे नमूद केले. कर्मचारी, ठेव प्रतिनिधी आणि संचालक मंडळ यांच्या परस्पर सहकार्यानेच संस्थेचा विकास शक्य झाला आहे. तसेच संस्थेचे सनदी लेखापरीक्षक, मूल्यनिर्धारक, कायदेविषयक सल्लागार, प्रतिनिधी, कर्जदारांच्या समस्या सोडविण्यासाठी सहकार्य करणारे मान्यवर तसेच सहकार विभागातील अधिकारी यांनी वेळोवेळी संस्थेला भेट देऊन संस्थेच्या कामकाजाचे कौतुक केले आहे.

कर्जदारांनी वेळेत कर्जफेड करावी:

संस्थेचा अनुत्पादक कर्जाचा स्तर कमीत कमी ठेवण्याचा संचालक मंडळाचा निर्धार आहे. थकीत कर्जदारांनी कर्ज बुडते किंवा माफ होते, असा गैरसमज करून घेऊ नये. घेतलेले कर्ज वेळेत फेडणे ही कर्जदाराची जबाबदारी आहे. कर्जदाराने कर्जाची परतफेड न केल्यास त्याचा परिणाम जामीनदारावरही होऊ शकतो. त्यामुळे कर्जदारांनी नियमितपणे कर्जाची परतफेड करून अप्रिय कारवाई टाळावी, असे आवाहन ॲड. मंगलताई हांडे यांनी केले.

महिलांसाठी विविध उपक्रम:

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचे कामही संस्थेने केले आहे. महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम, तसेच अकोले बसस्थानक येथे महिलांच्या सुरक्षितता व सोयीसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. संस्थेने अनेक महिलांना छोटे-मोठे व्यवसाय उभारण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे ही संस्था प्रत्येक महिलेची 'मातृसंस्था' म्हणून ओळखली जात असून महिलांना एकत्र येण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी संस्थेने भक्कम व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली:


अहवाल सालात देशाचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार, स्वर्गीय मंदाताई नवले, संस्थेच्या स्वीकृत संचालिका स्वर्गीय रोहिणीताई झोळेकर यांच्यासह संस्थेशी संबंधित व सामाजिक क्षेत्रातील दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संस्थेच्या सामाजिक जाणीवा आणि सभासदांशी असलेले भावनिक नाते यामुळे अशा प्रसंगी संस्था परिवाराप्रमाणे त्यांच्या पाठीशी उभी राहिली.

गेल्या अनेक वर्षांच्या वाटचालीत सभासदांचे प्रेम, आपुलकी, अतूट विश्वास आणि अनमोल सहकार्य यामुळे संस्थेला सहकार क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा मिळत आहे. महिलांनी महिलांसाठी सुरू केलेली ही संस्था आज आर्थिक प्रगतीसोबतच सामाजिक बांधिलकी जपत राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. त्यामुळे शनिवार, १२ सप्टेंबर रोजी होणाऱ्या ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संस्थेच्या पुढील वाटचालीस सहकार्य करावे, असे आवाहन संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# हरिभाऊ भांड यांचे निधन

**गोरेगाव (समर्थ गांवकरी)**

धोत्रे खुर्द येथील रहिवासी व कान्हूर पठार विविध कार्यकारी सोसायटीचे माजी सेक्रेटरी हरिभाऊ भिकाजी भांड (वय ७८) यांचे रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने धोत्रे खुर्द परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



हरिभाऊ भांड यांनी कान्हूर पठार विविध कार्यकारी सोसायटीत सेक्रेटरी म्हणून दीर्घकाळ जबाबदारी सांभाळत सहकार क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. शेतकरी व सभासदांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असत. सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना विविध सहकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे काम केले.

सहकार क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. गावातील विविध प्रश्नांमध्ये सहकार्य करणे आणि सर्वांशी आपुलकीचे संबंध ठेवणे, हा त्यांच्या स्वभावाचा विशेष गुण होता. शांत, संयमी आणि मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांनी गावात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी विमल, मुलगा संदीप उर्फ संजय भांड, मुली जिजा ढवण, अलका गवते, उज्वला पाचारणे, संध्या उर्फ सविता वाव्हळ तसेच नातवंडे असा परिवार आहे.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व मुख्याध्यापक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा सत्कार

## राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल गौरव

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**



राष्ट्रीय शैक्षिक योजना,दिल्ली यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड यांचा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, अहिल्यानगर महानगर तसेच अहिल्यानगर मुख्याध्यापक संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न तसेच प्रशासनाच्या माध्यमातून शिक्षण व्यवस्थेला दिलेल्या योगदानाची दखल घेत श्रीमती गायकवाड यांची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाली आहे.त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षक,मुख्याध्यापक व शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच अहिल्यानगर मुख्याध्यापक संघाच्या प्रतिनिधींनी शिक्षणाधिकारी श्रीमती गायकवाड यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

याप्रसंगी अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष प्रसाद सामलेटी, शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव बेरड,दादा चौधरी शाळेचे मुख्याध्यापक अशोक डोळसे,राष्ट्रीय पाठशाळेचे मुख्याध्यापक बोडखे,प्राचार्य शुभम टेमकर,साजिद पठाण, तौसिफ पठाण,नाना देवतरसे,शिदोरे सर,महिला आघाडीच्या सौ.कोकाटे मॅडम,प्राथमिक संघटनेचे श्रीराम खाडे, तुकाराम तनपुरे आदी उपस्थित होते.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी मूक मोर्चा

## पारोळा घटनेच्या निषेधार्थ ग्रामपंचायत अधिकारी संघ आक्रमक; विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र कायदेशीर संरक्षण द्यावे, पारोळा तालुक्यातील घटनेतील दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने मान्य कराव्यात, या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघाच्या अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या वतीने आज (१ सप्टेंबर) शांततामय मूक मोर्चा काढण्यात आला. मोर्चानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे येथे ग्राम सभा सुरू असताना ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर हा मोर्चा काढण्यात आला. कर्तव्य बजावत असताना झालेल्या या घटनेत त्यांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागला आणि त्यानंतर हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे संघाने निवेदनात नमूद केले आहे.

या घटनेमुळे ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, कर्तव्य बजावताना अधिकाऱ्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे, अशी प्रमुख मागणी संघाने केली आहे. मोर्चामध्ये पारोळा "टघटनेतील सर्व संबंधित आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना तातडीने अटक करावी व खटला जलदगती न्यायालयात चालवावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात तातडीने सुधारणा करून वर्षभरातील ग्रामसभांची संख्या मर्यादित करावी, ग्रामसभांच्या अनधिकृत चित्रीकरणावर निर्बंध आणावेत, सोशल मीडियावर ग्राम पंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

संवेदनशील, वादग्रस्त तसेच मोठ्या ग्रामपंचायतींच्या ग्रामसभा व बैठकींसाठी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरावीत आणि 'एक ग्रामपंचायत-एक ग्राम पंचायत अधिकारी' या प्रमाणात पदनिर्मिती करावी, अशी मागणीही करण्यात आली.

कृषी, आरोग्य, समाजकल्याण आदी विभागांच्या योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित विभागाकडे सोपवावी, तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या लाभार्थी निवडीची प्रक्रिया तालुका स्तरावर संबंधित विभागामार्फत पारदर्शकपणे राबवावी, अशी मागणी संघाने केली.

या वेळी ग्रामपंचायत अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर सुगंधा किसनराव जेजुरकर, सरचिटणीस पोपटराव आनंदराव रासकर (दक्षिण) आणि सहचिटणीस प्रमोदजी एकनाथ कानडे (उत्तर) यांच्यासह जिल्ह्यातील ग्राम पंचायत अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहानी...



नगर जिल्ह्यातील सहकार चळवळीमध्ये आजही ज्यांचे नाव सर्वच सचिवांमध्ये अग्रस्थानी असते सहकारामध्ये नेहमीच सर्वांना बरोबर घेऊन जात असताना नेहमी प्रसन्न हसतमुख असणारे अनेकांना सहकारामध्ये एकदा शब्द दिल्यानंतर कामात तत्परता नेहमी काम करत असताना कोणालाही कधीही लहान मोठा असा भेदभाव न करता अनेक वर्ष सहकारामध्ये काम करत असताना अनेक तरुणांना सचिव बनवत असताना काम करा सर्वांबरोबर चांगले संबंध ठेवा.... आढळा विभागामध्ये ज्यांनी आपलं आयुष्य सहकारांमध्ये अर्पण केला ते स्वर्गीय मच्छिंद्र नेहे साहेब........ खरंतर दहा दिवसापूर्वी त्यांना हृदयविकाराच्या त्रि व झटक्याने त्यांचे प्रांजोत मालवले खरं तर त्यांना आता त्यांचं बोनस आयुष्य त्यांच्या संसारात नातवंडांमध्ये रमाईचे होते काय देवा काय गुन्हा केलास तू आमच्यातील देव माणूस घेऊन गेलास नेहेसाहेबांचा स्वभाव अतिशय नम्र प्रत्येकाबरोबर सुसंवाद साधत असताना कधीही आर्यकारे हा शब्द कधीही त्यांच्या मुखातून आला नाही त्यांनी अनेकांना काम करत असताना आपल्या कामावरती नितांत प्रेम करत असायचे कारण आपली नेमणूक कशासाठी झाली शेतकऱ्यांची सेवा सभासदांची सेवा व जिल्हा बँकेतील अधिकाऱ्यांनी दिलेल्या कामाचे नियोजन व सभासदांच्या हिताचे काम करत असताना त्यांनी मोठ्या प्रमाणामध्ये मित्रपरिवार बनवला त्यांचा गुण म्हणजे कामात तत्परता व संचालक मंडळाला विचारल्याशिवाय कोणताही विषय ते पुढे नेत नसायचे एखाद्या कामांमध्ये निर्णय घेत असताना पदावर असलेला पदाधिकारी व संचालक किती महत्त्वाचा आहे हे त्यांच्या कार्यातून नेहमी दिसून यायचे संस्था सभासदांची असून अनाटाई खर्चाला कधी त्यांनी प्राधान्य दिले नाही त्यांनी जमवलेला मित्रपरिवार व सहकारातील अनेक सेवानिवृत्त सचिव आजही त्यांच्या कार्याची महती सांगतात सावरगाव पाट समशेरपुर केळी सांगवी टाहाकारी खिरविरे तिरडे या गावांमध्ये त्यांनी नोकरी करत असताना अनेकांबरोबर स्नेहाचे संबंध राहिले सामाजिक कार्यात ते नेहमी पुढे असायचे कारण काम करत असताना त्यांनी लाखो लोकांच्या मनात आपले स्थान निर्माण केले होते वरिष्ठ अधिकारी देखील त्यांना साहेब या नावानेच ओळखायचे कारण समशेरपुर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था ही त्या भागातील अनेक गावांची मातृसंस्था होती या मातृसंस्थेत काम करत असताना सर्व अधिकारी व राजकीय नेत्यांचे व्यासपीठ या संस्थेत तयार झाले या ठिकाणी हजारो कार्यकर्त्यांना घडविणारी ही संस्था या संस्थेमध्ये आल्यानंतर प्रत्येकाला मान पान सन्मान देणारा हा एक अवलिया होता सर्वांबरोबर संस्थेची संपूर्ण माहिती सांगत असताना अनेक सचिव त्यांनी घडविले आजही त्यांचा वारसा त्यांच्याकडे काम करणारी सर्व सचिव आजही त्यांच्या कार्यात तत्परता दिसून येते कारण विविध कार्यकारी सेवा संस्था या संस्थेच्या सभासद कर्ज वितरण कर्ज वसुली अण्णाठाई खर्चाला फाटा देणे व संचालक मंडळाला विश्वासात घेऊनच संस्था चालवणे हा कै मच्छिंद्र नेहे साहेब यांचा असलेला गुण आजही या भागातील अनेक सचिव जपतात हा त्यांच्या कार्याचा खरा पैलू आहे साहेबांनी मोठे विश्व निर्माण केले साहेबांनी एक आदर्श परिवार निर्माण केला साहेब कोणाचे वडील होते कोणाचे पती होते कोणाचे मित्र होते मात्र सर्वांबरोबर असणारा सुसंवाद व प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होणारा नेहा साहेब अचानक सर्वांना निरोप देऊन गेला त्यांच्या कार्याचा आदर्श त्यांच्या हाताखाली काम करणारी सचिव आजही पुढे नेताना दिसतात अशी पाखरे येती स्मृती ठेवूनी जाती त्याप्रमाणे सहकारात आणि आढाळा विभागात व जिल्ह्यात सचिव वर्गात त्यांनी एक वेगळे निर्माण केले होते काम व कामावर असणारे निष्ठा व कामातून पैसा कमावणे महत्त्वाचे नसून ज्या कामासाठी आपली नेमणूक करण्यात आली त्या संस्थेने ज्यास बँकेने आपल्यावर विश्वास ठेवला त्या विश्वासाला त्यांनी कधीही तडा जाऊ दिला नाही हीच खरी त्यांच्या कार्याची महंती हीच खरी त्यांना दशक्रिया विधी निमित्ताने श्रद्धांजली डॉक्टर विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

# हा महामार्ग जुन्नर तालुक्यातून नकोच : शेतकरी

**कल्याण (समर्थ गांवकरी)**

लातूर जनकल्याण महामार्ग विरोधी शेतकरी बैठक दिनांक :- ३० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता आमदार बाळासाहेब दांगट यांचे शाळेवर,कोळवाडी

तालुका जुन्नर येथे बाधित शेतकरी कुटुंबियांच्या उपस्थितीत संपन्न झाली. जुन्नर तालुक्यातून जाणाऱ्या कल्याण-लातूर जनकल्याण महामार्गास विरोध करण्यासाठी बाधित शेतकऱ्यांची बैठक व पत्रकार परिषद घेण्यात आली. महा मार्गाचे सर्वेक्षण गुगल मॅपवर उपलब्ध आहे.यामध्ये या महामार्गामुळे तळेरान,मढ, पारगाव, सितेवाडी,बगाडवाडीवाटखळ, कोळवाडी,कोल्हेवाडी,सांगणारे, कोटमवाडी, पिंपळगाव जोगा,डिंगोरे, उदापूर,अहिनवेवाडी,ओतूर व रोहोकडी या १६ गावांतील शेतकरी बाधित होणारआहेत.

शेतकऱ्यांनी हा महामार्ग जुन्नर तालुक्यातून नकोच अशी ठाम भूमिका घेतली. आजी-माजी आमदार, खासदार,सर्वपक्षीय नेते, जिल्हाधिकारी,मंत्री संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्याचे ठरले.प्रत्येक गावात विशेष ग्रामसभा घेऊन विरोधाचे ठराव मंजूर करणे व जुन्नर तालुका कल्याण-लातूर जनकल्याण महामार्ग विरोधी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.पुढील आंदोलनाची दिशा एकत्रित पणे ठरविण्यात येईल. जमिनी,शेती,घरे व गावांचे अस्तित्व अबाधित ठेवण्या साठी शांततामय लोकशाही मार्गाने लढा देण्याचा निर्धार करण्यात आला. बैठकीस मंदाताई दांगट, माजी जिल्हा परिषद सदस्य अंकुश शेठ आमले,भाजप नेते भगवानशेठ घोलप,सुरज वाजगे,स्वनिल अहिनवे, विशाल सस्ते,सुभाष घोलप, पोपट राक्षे,पंकज घोलप, अंबादास हांडे,शेतकरी संघटनेचे नेते बापूशेठ कुमकर तसेच,ग्राम पंचायतपदाधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.:

### प्रदूषणामुळे शेती आणि आरोग्यावर दुष्परिणाम

वाढती वाहतूक, धूर व प्रदूषणामुळे शेती व आरोग्या वर गंभीर परिणाम होणार असल्याचेही नमूद करण्यात आले. हा प्रकल्प विकास नसून विनाश आहे;आम्हाला आमच्या वडिलोपार्जित जमिनी द्यायच्या नाहीत, असा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला.अनेकशेतकऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

कल्याण-लातूर महामार्गा स सर्व बाधित शेतकऱ्यांचा ठाम विरोध असून, हा रस्ता जुन्नर तालुक्यातून नकोच या मागणीसाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्णय घेण्यात आला



**Name Changed**

I Have Changed My Old Name Wakchaure Shreyash Keru To New Name Wakchaure Shreyas Keru Adress –At/Post-Kalas Bk Tal-Akole Dist-A.Nagar 422601 By Notary No – 152/ 2026 Date – 27/08/2026

**Name Changed**

I HAVE CHANGE MY OLD NAME CHHAYA VIJAY AHER (PASSPORT) (BEFORE NAME) TO NAME AS CHHAYA VIJAYKUMAR AHER (AADHAR NO. 453497542958) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC PLACE: SANGAMNER DATE : 01/09/2026

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### जय मल्हार विद्यालयात रक्षाबंधन उत्साहात साजरा



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पिंपळगाव रोठा येथील जय मल्हार विद्यालयात रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे व आपुलकीचे नाते दृढ केले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकमेकांना शुभेच्छा देत बंधुभाव, प्रेम, स्नेह आणि परस्पर आदर जपण्याचा संदेश दिला.विद्यालयातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमामुळे शाळेच्या परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक, श्री बी आर उंडे सर, जेष्ठ शिक्षक श्री जरांगे सर, श्री गरकळ सर श्री केदारी सर,भगवंत भांबरे, संतोष घुले,नारायण पुंडे गौरी जगताप श्रीमती छाया केदारे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिव्हेश्वर जन्मोत्सवात चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

स्वकुळसाळी समाजाचे आराध्य दैवत भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत खुल्या शालेय चित्रकला स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या.या स्पर्धेत मोठ्या संख्नेने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.चित्रकलास्पर्धा विविध गटात घेण्यात आल्या यामध्ये निसर्गाचित्र, पावसातील घर,पाण्यातील बोट अशा विषयांवर विद्यार्थ्यांनी मनमोहक चित्रे काढली.

यावेळी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, खजिनदार गजेंद्र सोनवणे, उत्सव समिती प्रमुख निरज चांगटे,चलचित्रकार महेश कांबळे,मुख्याध्यापिका कल्पना भामरे, बबनभाई शेख,राजेंद्र गर्जे,सुशीलकुमार आंधळे,चंदा कार्ले,वैशाली

केदारे,अनिता जपकर,राणी पवार आदी उपस्थित होते.

चित्र काढताना आपण बारकाईने बघायला शिकतो.रंग,आकार, निसर्ग यांचे निरीक्षण वाढते आणि मन एकाग्र होते.चित्रकला आपल्याला कल्पनाशील बनवते.एक कोरा कागद आणि रंगांच्या सहाय्याने आपण नवीन विश्व निर्माण करू शकतो.चित्रकलेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास होतो.असे पाठक म्हणाले तर महेश कांबळे यांनी चित्र काढण्यासाठी पट्टीचा वापर करू नये.असे उद्बोधन केले.

### निराधार वृद्ध महिलेला वन चेतना फाउंडेशनचा मदतीचा हात

**महिनाभराचा किराणा साहित्य भेट!**



ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)

ब्राम्हणवाडा गावातील एकल व निराधार वृद्ध महिला श्रीमती बायजाबाई हनुमंता रुपवते यांना वन चेतना फाउंडेशनच्या वतीने मदतीचा हात देण्यात आला. फाउंडेशनचे सदस्य व प्राथमिक आरोग्य केंद्र ब्राम्हणवाडा येथील आरोग्य अधिकारी डॉ. विवेक घायाळ यांच्या सौजन्याने व वन चेतना फाउंडेशन ब्राम्हणवाडा यांच्या माध्यमातून या वृद्ध महिलेला दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असलेल्या विविध किराणा वस्तूंचे एक महिन्याचे साहित्य देण्यात आले.

समाजातील गरजू, निराधार व वंचित घटकांना आधार देण्याच्या उद्देशाने वन चेतना फाउंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. वृद्ध महिलेच्या गरजा लक्षात घेऊन जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्याने तिच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी वन चेतना फाउंडेशनचे सदस्य डॉ. प्रदीप कुमकर, डॉ. निलेश कडाळी, नवनाथ पवार, मुराद पटेल तसेच पत्रकार संजय गायकर उपस्थित होते.

# माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या उत्तर महाराष्ट्राच्या दौऱ्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद

## जळगाव धुळे येथील विविध मोठ्या कार्यक्रमांना उपस्थिती
## राजवाडे इतिहास संशोधन मंडळाचे कार्य देशासाठी महत्त्वाचे : माजी मंत्री बाळासाहेब थोरात



संगमनेर (समर्थ गांवकरी)

काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा राज्याचे मा. महसूल व कृषी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी उत्तर महाराष्ट्रातील धुळे जळगाव या जिल्ह्यांचा दौरा केला असून विविध तालुक्यांमधून नागरिकांचा मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. धुळे येथील राजवाडे इतिहास संशोधन मंडळाचे इतिहास जतन व संशोधन करण्याचे अत्यंत मौलिक काम केले असल्याचे गौरवोद्गार याप्रसंगी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते एकनाथराव खडसे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन कार्यक्रम व धुळे येथील राजवाडे इतिहास संशोधक मंडळाच्या वतीने १०० वर्षात पदार्पण व खासदार शरदचंद्रजी पवार यांचा कृतज्ञता सोहळा संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर जेष्ठ नेते खासदार शरदचंद्रजी पवार, आमदार एकनाथराव खडसे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, आमदार जयंत पाटील, शशिकांत शिंदे, हर्षवर्धन पाटील , माजी मंत्री दिलीप वळसे पाटील हे उपस्थित होते तर धुळे येथील कार्यक्रमात वरील मान्यवरांसह मंत्री जयकुमार रावल,खासदार अमोल कोल्हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, इतिहासाचार्य वि.का राजवाडे संशोधन मंडळ धुळे ही संस्था शंभराव्या वर्षात पदार्पण करत आहे या १०० वर्षाच्या वाटचालीमध्ये खासदार शरदचंद्र पवार यांनी या संस्थेला मोठा आधार दिला आहे.

यशवंतराव चव्हाण साहेब यांच्यानंतर महाराष्ट्रामध्ये शरदचंद्रजी पवार यांचा कालखंड सुरू झाला. विविध प्रश्नांची जाण असलेले आणि नेमका प्रश्न समजून त्यावर उत्तर देणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे त्यांच्या प्रतिकृतज्ञता व्यक्त होणे आनंदाचा क्षण आहे.

इतिहास जतन करणे ही सोपी गोष्ट नाही शेकडे वर्षापूर्वीच्या इतिहासाचा बारकाईने अभ्यास करून त्याचे दस्तऐवजीकरण करणे व सोप्या भाषेत मांडणी करणे यासाठी मोठी मेहनत आणि चिकाटी लागते आपल्या गावाला आणि परिसराला ऐतिहासिक ओळख म्हणून देण्याचे काम राजवटी इतिहास संशोधन मंडळांनी केले आहे. आणि हा इतिहास जपणारे आणि तो जिवंत करणारे खासदार डॉ. अमोल कोल्हे हे आहेत.

संगमनेरचा आणि धुळे संशोधन मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाठक यांच्या समवेत संजय मुंदडा यांचेही काम मोठे आहे संजय मुंदडा हे संगमनेरचे जावई आहेत. सातत्याने या कार्यक्रमासाठी त्यांचा पाठपुरावा सुरू होता.

तर मुक्ताईनगर येथे बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की एकनाथ खडसे यांनी राजकारण विरहित माणसे जोडले. १९९० पासून ते विधिमंडळात कार्यरत आहेत तापी खोरे विकास महामंडळ निर्मितीचे श्रेय हे एकनाथराव खडसे यांना आहे.

यावेळी खासदार शरदचंद्र पवार म्हणाले की, भाजप पक्ष वाढवण्यामध्ये एकनाथ खडसे यांचा मोठा वाटा राहिला आज भाजप जो सत्तेत आहे तो महाराष्ट्रात एकनाथ खडसे यांच्यामुळे आहे तर धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळांनी इतिहास संशोधन करून पुढील अनेक पिढ्यांसाठी वैभवशाली व प्रेरणादायी इतिहास निर्माण केला आहे हे काम यापुढेही त्यांना चालू ठेवावे लागणार आहे.

यावेळी खासदार डॉ अमोल कोल्हे म्हणाले की पुरोगामी विचार जपणारा महाराष्ट्राचा सह्याद्री आज पवार साहेब आपल्यामध्ये आहेत. त्यांच्या प्रेरणादायी विचारातून महाराष्ट्राची वाटचाल आपल्याला सुरू ठेवायची आहे. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, मंत्री जयकुमार रावल, अरुण भाई गुजराती यांनीही आपली मनोगत व्यक्त केली. यावेळी अरुण गुजराती,उत्तर महाराष्ट्रातील विविध मान्यवरांसह संगमनेरचे डॉ संतोष खेडलेकर उपस्थित होते

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगमनेरचे डॉसंजय मालपाणी यांनी केले.

उत्तर महाराष्ट्राच्या दौऱ्यामध्ये माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी चोपडा तालुक्यातील अरुण गुजराथी यांच्या निवासस्थानी भेट दिली. तर जळगाव येथे कार्यकर्त्यांची बैठक घेतली यानंतर पारोळा धुळे या ठिकाणीही कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या या सर्व बैठकांना काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व इतर पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओतूरच्या श्री कपर्दिकेश्वर मंदिरात तिसऱ्या श्रावणी सोमवारी दीड लाख भाविकांनी घेतले दर्शन

ओतूर (समर्थ गांवकरी)



जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे मांडवी नदीच्या तीरावर असलेल्या पुरातन व ऐतिहासिक श्री कपर्दिकेश्वर मंदिरात सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी तिसरा श्रावणी सोमवार मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच शिवभक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त सकाळी सहा वाजता श्री व सौ रमेश शिवाजीराव पाटील डुंबरे, श्री व सौ निलेश मारुती पानसरे, श्री व सौ दीपक श्रीकृष्ण तांबे तसेच दर्शन बारीतील पहिले भाविक श्री व सौ दीपक गीते यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

यावेळी श्री कपर्दिकेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अनिलशेठ तांबे, सचिव महेंद्र (गांधी) पानसरे यांच्यासह देवस्थानचे पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. महाआरतीनंतर मंदिर भाविकांसाठी दर्शनास खुले करण्यात आले.

यावेळी पुजारी गोविंदराव डुंबरे, अक्षय तांबे, सागर दाते, सचिन तांबे, यतीन शेटे, रघुनाथ अण्णा तांबे, राजेंद्र डुंबरे, जितेंद्र डुंबरे, अमोल काका डुंबरे, विश्वास पाटील डुंबरे, श्रेयस डुंबरे, प्रसाद डुंबरे, योगेश डुंबरे, तन्मय इस्कांडे, अक्षय ढमाले, तात्या ताजणे, नितीन तांबे आदी उपस्थित होते.

तिसऱ्या श्रावणी सोमवारच्या यात्रेनिमित्त भाविकांना पटेल परिवार ओतूर, श्री नितीन सोनवणे, कल्याण यांच्या वतीने खिचडी प्रसाद वाटप करण्यात आले तसेच जयसिंग विठ्ठल डुंबरे यांच्या वतीने राजगिरा लाडू व केळी वाटप करण्यात आले. मंदिर परिसर विविध दुकानांनी सजला होता. हार, बेल, फुले, प्रसाद, पेढे, खाद्यपदार्थ, खेळणी, गृहपयोगी वस्तू तसेच मनोरंजनाची साधने व पाळणे यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांचे नियोजन –

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन ओतूर पोलिस यंत्रणेच्या वतीने सुरक्षिततेसाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रमुख मार्ग तसेच यात्रा परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक सुरळीत राहावी, गर्दीच्या ठिकाणी चेंगराचेंगरी होऊ नये तसेच भाविकांना सुरक्षितपणे दर्शन घेता यावे यासाठी पोलिसांकडून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. पोलिस कर्मचारी व स्वयंसेवकांच्या माध्यमातून गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात येत असल्याचे ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी सांगितले.

# ७५ वा भटके-विमुक्त दिन उत्साहात; ऐतिहासिक स्वातंत्र्यदिनी समाजाच्या संघर्षाला अभिवादन!

## कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्या हस्ते 'दैनिक समर्थ गांवकरी'च्या विशेषांकाचे प्रकाशन!





मुंबई (समर्थ गांवकरी)

३१ ऑगस्ट १९५२ हा दिवस भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. इंग्रजांनी भटक्या-विमुक्त जमातींना 'जन्मजात गुन्हेगारी जमाती' म्हणून ठरविणारा अन्यायकारक कायदा याच दिवशी रद्द केला. त्यामुळे ३१ ऑगस्ट हा दिवस या समाजासाठी केवळ स्मरणदिन नसून, खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. वर्षानुवर्षे अन्याय, उपेक्षा आणि सामाजिक विषमता सहन करणाऱ्या या समाजाच्या संघर्षाची आठवण करून देणारा हा दिवस दरवर्षी विविध उपक्रमांनी साजरा केला जातो.

या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भटके-विमुक्त जाती-जमाती सेलच्या वतीने भटके-विमुक्त परिषद व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात दैनिक समर्थ गांवकरीच्या विशेष अंकाचे प्रकाशन राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, ज्येष्ठ पत्रकार सुनील गीते, कृषक प्रदेशाध्यक्ष ॲड. वसंत मनकर यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

भटके-विमुक्त समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि सन्मानाने जगण्याच्या समान संधी मिळणे आवश्यक आहे.

या समाजाने केलेला संघर्ष, त्याग आणि स्वाभिमानाची लढाई पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. ७५ व्या भटके-विमुक्त दिनानिमित्त समाजाच्या संघर्षाला आणि त्यागाला मनःपूर्वक अभिवादन करत, सामाजिक न्याय, समानता आणि सन्मानासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचा संकल्प करण्यात आला.

# माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यामुळे महादेव देवस्थानांसह तालुक्यातील तीर्थक्षेत्रांचा विकास : आमदार सत्यजित तांबे

## आमदार सत्यजित तांबे यांनी खिचडी बनवून भाविकांना केले प्रसादाचे वाटप

संगमनेर (समर्थ गांवकरी)

तालुका हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली विकासातून वैभवकडे जाणारा ठरला आहे. या प्रगती बरोबर तालुक्यातील प्रत्येक गावांमधील देवस्थाने त्याचबरोबर तालुक्यात असलेल्या महादेव क्षेत्रासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने निधी दिला असून हे सर्व क्षेत्र अध्यात्माची तीर्थक्षेत्र ठरले असल्याचे प्रतिपादन असल्याचे प्रतिपादन आमदार सत्यजित तांबे यांनी केले आहे.

खांडगाव येथील खंडेश्वर व बुद्रुक येथील रामेश्वर येथे आमदार सत्यजित तांबे यांनी श्रावणी तिसऱ्या सोमवार निमित्त पूजा केली यावेळी समवेत देवस्थानचे अध्यक्ष लहान भाऊ गुंजाळ, दूध संघाचे संचालक रमेश गुंजाळ, सचिव अशोक गुंजाळ, भास्कर गुंजाळ ,संजय गुंजाळ, कपिल गुंजाळ, श्रीरंग गुंजाळ, पांडुरंग गुंजाळ ,नारायण गुंजाळ, भाऊ पाटील गुंजाळ आदी उपस्थित होते तर रामेश्वर या ठिकाणी बाळासाहेब देशमाने, रामहरी कातोरे, अध्यक्ष सुनील देशमुख, विजय कोल्हे, सचिव दत्ता कासार ,माजी सभापती अनिल देशमुख, सावळेराम साबळे ,नवनाथ नाईकवाडी, नवनाथ देशमाने ,अमोल महाले, मॅनेजर संजय थोरात ,कोमल उगले, सरपंच सौ उज्वला देशमाने, प्रिया मस्के, सारिका परदेशी ,संगीता देशमुख ,स्वदेश युवा प्रतिष्ठान व स्वदेश महिला मंचच्या विविध पदाधिकारी उपस्थित होत्या. यावेळी बोलताना आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, संगमनेर तालुका हा विस्ताराने खूप मोठा आहे. ११० किलोमीटर लांबी असलेल्या या तालुक्यांमध्ये पठार भाग प्रवरा पट्टा आणि तळेगाव असे भौगोलिक तीन विभाग पडतात. सततच्या विकास कामांमधून संगमनेर तालुका हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी आदर्शवत बनवला आहे. कृषी सहकार शिक्षण शहरातील बाजारपेठ पायाभूत सुविधा यांसह तालुक्यांमध्ये अध्यात्मिक व सांस्कृतिक वातावरण निर्माण केले आहे. एकता व मानवता हा धर्म जोपासताना सर्व गावांमधील मंदिरांना मोठा निधी दिला आहे. सभा मंडपासह मंदिरांचे सुशोभीकरण केले आहे.



तालुक्यामध्ये खांडेश्वर ,बाळेश्वर, रामेश्वर ,नीझरनेश्वर, दुधेश्वर अमृतेश्वर हे सर्व देवस्थाने विकास कामांमधून आदर्शवत बनवली आहे. विविध देवस्थानांना पर्यटन विभागाच्या माध्यमातून दर्जा मिळून देत सुशोभीकरण व भाविकांना चांगल्या सुविधा निर्माण करून दिले आहे. खांडगाव देवस्थान मध्ये शहरातील नागरिकांची मोठी वर्दळ असते. अत्यंत निसर्गरम्य हा परिसर असून सर्वांनी श्रावण महिन्यात दर्शनासाठी यावे असा हा परिसर आहे. संगमनेर तालुका हा अध्यात्माचे मोठे क्षेत्र बनले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. याचबरोबर यापुढील काळातही प्रत्येक गावांमधील विकास कामांबरोबर तीर्थक्षेत्रांच्या विकासाबाबत कुठेही निधी कमी पडू देणार नाही असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.याप्रसंगी रामेश्वर देवस्थानच्यासाठी बाळासाहेब देशमाने व प्रदेश समूहाच्या वतीने रामेश्वर मुकुटाचे अर्पण आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील नागरिक महिला युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महादेव तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मोठी गर्दी

**खंडेश्वर, निझरनेश्वर, रामेश्वर, अमृतेश्वर दुदेश्वर या सर्व महादेवांच्या ठिकाणी आज भाविकांची मोठी गर्दी होती तिसऱ्या सोमवार निमित्त आमदार सत्यजित तांबे यांनी खांडगाव येथे खिचडी बनवली याचबरोबर सर्व भाविकांची आस्तेवाईकपणे चौकशी करून भाविकांना प्रसादाचे वाटप केले. यावेळी सर्व भाविकांनी हर हर महादेव म्हणत प्रसादाचा आनंद घेतला.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## गोरक्षनाथ कराळे यांची 'ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया)'च्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

नगर तालुक्यातील पोखर्डी येथील तरुण गोरक्षनाथ कराळे यांनी सुरवातीपासून वाहनांच्या आणि वाहन चालकांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा दिला.आता त्यांच्यावर समाजसेवक 'ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया)'च्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची महत्वपूर्ण जबाबदारी देऊन नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील वाहन चालक वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



श्री.कराळे यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात 'जय संघर्ष वाहन चालक-मालक संघटना'च्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पदापासून केली. त्यानंतर त्यांनी 'जन सेवा ड्रायव्हर पार्टी'च्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. वाहन चालकांच्या हक्क व हितासाठी, तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी त्यांनी अनेक मोर्चे, आंदोलने आणि उपोषणे करून चालकांना न्याय मिळवून दिला आहे.त्यांच्या या प्रदीर्घ सामाजिक अनुभवाची आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन 'ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया) चे अध्यक्ष श्री.प्रवीण तिवारी, महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री.गोरख कल्हापुरे तसेच ट्रस्ट चे वरिष्ठ पदाधिकारी यांच्या सर्वानुमते श्री.कराळे यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड केली आहे.


चालकांच्या पाठीशी ठाम उभे राहण्याचा निर्धार व्यक्त करून आपल्या नियुक्तीबद्दल बोलताना गोरक्षनाथ कराळे म्हणाले, वाहनांच्या आणि वाहन चालकांच्या विविध समस्या सोडवून, गरजूंना तातडीने मदत पोहोचवणे आणि रस्त्यांवर होणाऱ्या अपघातातील बाधितांना वेळेत हॉस्पिटलमध्ये दाखल करून त्यांचे प्राण वाचवणे, हे मी माझे प्राथमिक कर्तव्य मानतो.

नवीन जबाबदारीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातील वाहन चालकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांच्या प्रश्नांसाठी, कल्याणासाठी आणि विविध कल्याणकारी योजना राबवण्यासाठी काम करीत राहीन. असे सांगितले.या निवडीबद्दल त्यांचे विविध चालक संघटना, सामाजिक संस्था, सर्व सामान्य नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संकष्टी चतुर्थीला वरदविनायकाच्या चरणी भक्तिसागर!

**पहाटेपासून भाविकांच्या रांगा; सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाने कोतूळ नगरी दुमदुमली**

**कोतूळ (समर्थ गांवकरी)**



श्रावण महिन्यातील संकष्टी चतुर्थीनिमित्त कोतूळ, ता. अकोले येथील प्राचीन व जागृत श्री वरदविनायक देवस्थानात सोमवारी भक्तीचा महासागर उसळला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. कोतूळसह अकोले तालुक्यातील विविध गावांतून महिला, पुरुष व कुटुंबांसह भाविक मोठ्या संख्येने मंदिरात दाखल झाले. दिवसभर मंदिर परिसरात 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

पहाटेच्या थंड वातावरणातही भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. भूपाळी वादनाने दिवसाची सुरुवात झाली. त्यानंतर शेखर शेटे यांच्या हस्ते श्री वरदविनायकाची विधिवत महापूजा करण्यात आली. महापूजेनंतर भाविकांसाठी मंदिर दर्शनास खुले करण्यात आले. श्रींच्या चरणी दुर्वा, फुले, नारळ व मोदक अर्पण करून भाविकांनी सुख-समृद्धी, आरोग्य व संकट निवारणासाठी प्रार्थना केली.

भाविकांसाठी विविध सुविधा

संकष्टी चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर देवस्थानच्या वतीने भाविकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. पिण्याचे पाणी, अभिषेक व्यवस्था, देणगी कक्ष तसेच प्रसाद वाटपाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. दुपारनंतर देवस्थानच्या वतीने भाविकांना शाबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. दर्शनासाठी आलेल्या असंख्य भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला.

## वासिंदमध्ये ५ सप्टेंबरला रंगणार शहापूर तालुक्यातील मानाची भव्य दहीहंडी!

**श्रीराम मित्र मंडळाच्या २६ व्या वर्षानिमित्त ५ लाख ५0 हजार रुपयांची पारितोषिके; अभिनेत्री व कलाकारांची विशेष उपस्थिती!**

**वासिंद (समर्थ गांवकरी)**

श्रीराम मित्र मंडळ, वासिंद यांच्या वतीने शहापूर तालुक्यातील मानाचा दहीहंडी उत्सव शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४.३० वाजता मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. श्रीराम मित्र मंडळाच्या स्थापनेला यंदा २६ वर्षे पूर्ण होत असून, त्यानिमित्ताने भव्य मानाच्या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात गोविंदा पथकांसाठी एकूण ५ लाख ५0 हजार रुपयांची आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत.

दुपारच्या सत्रात बालगोपालांसाठी विशेष आकर्षण असलेली भव्य वेशभूषा स्पर्धा, तसेच महिला भगिनींसाठी पैठणी लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे या उत्सवाला आबालवृद्धांसह महिला व बालकांची मोठी गर्दी होण्याची अपेक्षा आहे. उत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

या जल्लोषपूर्ण सोहळ्यास 'शुभ श्रावणी', 'झी मराठी' मालिका तसेच 'बाळू मामाच्या नावानं चांगभलं' फेम अभिनेत्री वंदना पांचाळ, 'घाशीराम कोतवाल' नाटक फेम सुप्रसिद्ध नाट्य अभिनेत्री व गायिका ज्योती परब तसेच 'रात्रीस खेळ चाले' फेम अभिनेते विकास थोरात यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या भव्य दहीहंडी उत्सवाला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक श्रीराम मित्र मंडळ, वासिंदचे अध्यक्ष श्री. अनिल दिगंबर मानवीडे व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.